# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — १५८०/२०२२/अहमदनगर**

१ श्री. नारायण संपत नरवडे : अपिलार्थी
मु.पो. कडूस, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
सहाय्यक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, नेवासा,
ता. नेवासा, जि. अहमदनगर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, नेवासा,
ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**सुनावणी दिनांक — २२/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. ०१/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी सदर माहिती ही प्रशासकीय कामकाजाशी निगडीत असल्याने माहिती न देता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असमाधानकारक निर्णय पारित केला, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी

**सुनावणीसाठी अनुपस्थित-** अपिलार्थी, तत्कालीन जन माहिती अधिकारी, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी

अपिलार्थी यांनी दि. ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०४/२०२० ते दिनांक ३०/९/२०२१ या कालावधीतील १. पंचायत समिती नेवासा अंतर्गत कार्यरत असणाऱ्या ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी वरील कार्यकालामध्ये घेतलेल्या किरकोळ रजा/अर्जित रजा/वैद्यकीय रजा यांचे दाखल केलेल्या रजा अर्जाच्या साक्षांकित प्रती, २. पुर्व परवानगी रजा मंजुरी आदेशाच्या साक्षांकित प्रती, ३. रजा उपभोगलेनंतर दिलेल्या मंजुरी आदेशाच्या साक्षांकीत प्रती, ४. रजा उपभोगलेनंतर उपरोक्त कालावधीतील ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांचे शिल्लक रजा गोषवाऱ्याच्या साक्षांकीत प्रती बाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती ही कनिष्ठ सहायक, अस्था-२, (ग्रामसेवक) कार्यासन, पंचायत समिती, नेवासा यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने दिनांक ०८/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी

अधिनियमातील कलम ५ (४) अन्वये सहाय्य करण्याबाबत कळविले. त्यानंतर पंचायत समिती कडून प्राप्त माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक ०३/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक तपशीला संबंधित असल्याने तसेच सदर माहितीमध्ये व्यापक जनहित दिसुन येत नसल्याने सदर माहिती पुरविता येत नाही, असे कळविले.

त्यादरम्यान अपिलार्थी यांनी दि. ११/११/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. ०७/०१/२०२२ रोजी, निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवुन प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही अस्था-२, (ग्रामसेवक) कार्यासन, पंचायत समिती, नेवासा यांच्याशी संबंधीत असल्याने सदर माहिती प्राप्त करुन पुरविण्यात आली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही शासकिय अभिलेख असल्याने माहिती पुरविणे आवश्यक असतांना चुकीचे कारण नमुद करुन माहिती पुरविली नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मध्ये द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शिफारस करणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, नेवासा यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १५८०/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./१५८०/२०२२/अहमदनगर ओ-** 2232 **दिनांक-** 19/10/2022